# सकाळ

शनिवार, १३ फेब्रुवारी २०२१




सातारा : छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये योगेश कदम यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी डॉ. शिवाजी पाटील आदी.

## ‘बीडीओ’पदी निवड झालेल्या कदमांचा सत्कार

**सातारा :** राज्य सेवा परीक्षेतून गटविकास अधिकारीपदी निवड झालेल्या योगेश कदम यांचा छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये झालेल्या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. या कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या फाउंडेशन कोर्स मार्गदर्शनावेळी हा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. कदम यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासात सातत्य ठेवण्याचे आवाहन केले. अभ्यासातील सातत्यामुळे सामान्य कुटुंबातील मुलेही स्पर्धा परीक्षेत उज्ज्वल यश मिळवू शकतात, असे त्यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक डॉ. शिवाजी पाटील यांनी प्रास्ताविकात केंद्राच्या यशाची माहिती दिली. उपप्राचार्य गणेश पाटील, प्रा. एस. टी. भुजबळ, समन्वयक डी. सी. जाधव, विकास ताटे-देशमुख, प्रदीप लोंढे यावेळी उपस्थित होते.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा